RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक २७] शुक्रवार, मे ८, २०२६/वैशाख १८, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ५४

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मे २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

क्रमांक युडब्ल्युए-२०२६/प्र.क्र.६९/ काम-५.—महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (महाराष्ट्र १९६९ चा क्र.३०) च्या कलम ६ मधील उप-कलम (३), (५) आणि (६) तसेच महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) नियम, १९७० मधील नियम ३ च्या उप नियम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासन अधिसूचना क्र. २०२४/प्र.क्र.२०१/काम-५, दि.१७.०९.२०२५ अन्वये, माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई, या मंडळावर राज्य शासनाचे, मालकांचे आणि कामगारांचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार सदर मंडळावर राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून श्री. समीर चव्हाण, कामगार उप आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली होती.

२. तथापि, आता राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून श्री. समीर चव्हाण, कामगार उप आयुक्त यांच्याऐवजी श्री. अशोक लक्ष्मण डोके, कामगार उप आयुक्त तथा अध्यक्ष, माल वाहतूक कामगार मंडळ, मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

३. त्यानुसार श्री. अशोक लक्ष्मण डोके, कामगार उप आयुक्त यांची उक्त मंडळावर अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन करण्यात येत आहे आणि अध्यक्षांसह उक्त मंडळाच्या सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

१. श्री. अशोक लक्ष्मण डोके, कामगार उप आयुक्त.
२. श्री. प्रकाश जगन्नाथ मस्कर.
३. श्री. जयकुमार गजानंद गुप्ता.
४. श्री. दत्तात्रय विठ्ठल घंगाळे
५. श्री. बळवंतराव सोनापा पवार

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिलीप आ. वणिरे,
शासनाचे अवर सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 8th May 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE), ACT, 1969.

No. UWA 2026/C.R.69 /LAB-5.— In exercise of the powers conferred by sub-sections (*3*), (*5*) and (*6*) of section 6 of the Maharashtra Mathadi, Hamal and Other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Act, 1969 (Mah. XXX of 1969) read with sub rule (1) of rule 3 of the Maharashtra Mathadi, Hamal and Other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Rules, 1970 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra by Notification No. 2024/C.R.201/Lab-5, dated 17.09.2025, appointed members representing the State Government, employers and workers on the Goods Transport Workers Board, Brihanmumbai. Accordingly, Shri. Sameer Chavan, Deputy Commissioner of Labour has been appointed as the representative of the State Government on the said Board.

2. However, Now Shri. Ashok Laxman Doke, Deputy Commissioner of Labour and Chairman, Goods Transport Workers Board, Mumbai, is being appointed as the representative of the State Government instead of Mr. Sameer Chavan, Deputy Commissioner of Labour.

3. Accordingly, Shri. Ashok Laxman Doke, Deputy Commissioner of Labour is nominated as Chairman of the board and publishing the names of the members of the said Board along with chairman as follows:—

1. Shri. Ashok Laxman Doke, Deputy Commissioner of Labour.
2. Shri. Prakash Jagannath Maskar.
3. Shri. Jayakumar Gajanand Gupta.
4. Shri. Dattatray Vitthal Ghangale.
5. Shri. Balwantrao Sonapa Pawar.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DILIP A. VANIRE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.